Code: A-M712091-UI

5 x 1500

# I Semester Exam – 2023-24


Std.: IX | Sub: Marathi (Comp.) | Marks: 40

Date: | Roll No.: ________ | Time: 2 hrs.

## विभाग – १ गद्य

**प्र. १ अ) पाठाचा उतारा वाचून दिलेल्या सुचनांनुसार कृती करा.** ६

**१) आकृती पूर्ण करा.** २




आत शिरलात, की काही गुंफांत तुम्हांला प्रशस्त लांबरूंद दालन दिसतील. चार–पाच मीटर त्याची उंची. वर सपाट छत. दोन्ही बाजूंना भव्य स्तंभ कोरलेले अन् नक्षीदार प्रवेशद्वारावर अर्धवर्तुळाकृती गवाक्षे. गवाक्षे म्हणजे हवा व उजेड आत येण्यासाठी खिडक्या. चला, माझ्यामागून ओळीने या.

आत शिरताच गारेगार वाटलं ना ? उन्हातान्हातून प्रवास केल्याचा शिणवटा निघून गेला की नाही ? लेण्यांतली हवा अशीच नेहमी गारेगार असते.

आता समोर लक्ष दया. केवढा प्रशस्त चौथरा आहे हा ! आणि त्यावर कोण बसलं आहे सांगा बरं! 'भगवना गौतम बुद्ध'. बुद्ध ओळखण्याची खूण म्हणजे पद्मासन घालून बसलेले, डोळे अर्धवट मिटलेल्या कमळासारखे आणि नजर नाकाच्या शेंड्यावर खिळलेली. मुखावर करुणेचा भाव, कानाच्या पाळ्या लोंबलेल्या. जवळजवळ खांद्याला भिडलेल्या. मस्तकावर कुरळ्या केसांच्या जटा. एवढं लक्षात ठेवलंत, की तुम्हांला कुठेही गौतम बुद्ध ओळखता येतील.

इथल्या सगळ्या लेण्यांना नावं नाहीत, पण एकोणिसाव्या लेण्याला नाव आहे, त्याला म्हणतात गंधकुटी. हे लेणे तुम्ही सावकाशीनं पाहा. बराच वेळ लागेल, कारण ते आत, बाहेर व सगळीकडे कोरीव कामानं नटलं आहे. त्याच्यासमोर द्वारमंडप आहे. खांब सगळे वाटोळे. ते पाहा दुसरे बुद्ध. खाली नव्हे, वर दोन खांबाच्या कमानीत ! इथे ते उभे आहेत अन् त्यांनी एक पायघोळ अंखरखा घातला आहे. त्याच्या चुण्या कशा अगदी स्पष्ट दिसतात. मुद्रासुद्धा किती शांत, किती गंभीर!

**२) चौकटी पूर्ण करा.** १

१) एकोणिसाव्या लेण्याचे नाव – ☐


२) मस्तकावर कुरळ्या केसांच्या – ☐

**३) स्वमत कृती.** ३

लेण्यांतील गौतम बुद्धांची मूर्ती पाहून तुमच्या मनात निर्माण झालेल्या भावना स्वभाषेत लिहा.

**आ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.** ६

**आकृती पूर्ण करा.** १




(मागे पहा)

**२) कारणे शोधा.** २

१) सुरुवातीलाच सामना रंगायला सुरुवात झाली, कारण ——————

२) 'पाच बाद पाहिजेत पाच ! अशी काही मुले ओरडली, ——————

ओली–सुकी झाली. सहावीच्या कर्णधाराने ओली–सुकी जिंकली. त्याने दम घालण्यास सुरुवात केली. सातवीचे खेळाडू तयारच होते. त्यांनी सहावीच्या कर्णधाराला चांगले कोपऱ्यात घेतले. कोपरा धरणाऱ्या मुलाने मोठ्या धीराने त्याचा पाय पकडला. त्याबरोबर मध्या भिडूने त्याच्यावर एकदम झडप घालून त्याला पकडले. प्रेक्षकांतून जोरदार आरोळ्या उठल्या. सुरुवातीपासून सामना रंगायला सुरुवात झाली.

सातवीच्या संघाचा आवेश वाढला. त्यांचा हुकमी एक्का सावंत कबड्डी घालण्यास गेला. ''सावंत, पाच बाद पाहिजेत पाच !'' असे काही मुले ओरडली. सावंतच्या अंगात चांगलीच ताकद होती. त्याचे हाडपेरही मजबूत होते, पण सहावीच्या खेळाडूंनी त्याला पकडायचा निर्धार केला होता. सावंत आत आला, तशी सहावीच्या खेळाडूंनी साखळी धरली. बघता बघता त्याला त्यांनी घेरले, पण सावंत कसला वस्ताद ! त्याने हां हां म्हणता साखळी तोडली व तो मध्यरेषेकडे तडफेने पोहोचला. त्याबरोबर आवाज उठले, ''शाब्बास सावंत, भले बहाद्दर! '' सहावीचे तीन गडी बाद झाले. प्रेक्षकांत धमाल उडाली.

**२) जोड्या जुळवा.** १

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| १) ओली–सुकी जिकणारा | अ) सांवत |
| २) हाडापेराने मजबूत | ब) सुळे |
| | क) सहावीचा कर्णधार |

**३) पुढील वाक्यांतील शब्दांचा योग्य क्रम जुळवून अर्थपूर्ण वाक्य तयार करा.** २

१) आवेश, संघाचा, वाढला, सातवीच्या

२) अंगात, ताकद, सावंतच्या, होती, चांगलीच

## विभाग – २ पद्य

**प्र. २ अ) किवतेच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.** २

१) संत निर्मळा यांनी पांडुरंगाचे खालील बाबतीत केलेले वर्णन

कुठे उभा आहे ? → ______

किती काळ उभा आहे ? → ______

अनाथांचा नाथ कृपावंत देवा।
घडो तुमची सेवा अहर्निशीं ।।१।।
अ़ठ्ठाविस युगें विटेवरी उभा।
वामभागीं शोभा रुक्मादेवी।।२।।
पतित पावन गाजे ब्रीदावळी।
पुरवावी आळी हीच माझी।।३।।
उभा विटेवरी ठेवोनी चरण।
म्हणतसे बहिण चोखियाची।।४।।

**२) दिलेल्या पंक्तींचा सरळ अर्थ लिहा.** २

अनाथांचा नाथ कृपावंत देवा।
घडो तुमची सेवा अहर्निशीं ।।१।।

२) **अचूक शब्द ओळखा:** १

सायंकाळी, सायंकालि, सायंकाली

३) **खालील शब्दांचे विरूद्धार्थी शब्द लिहा.** १

अ) चढणे x ब) स्पष्ट x

४) **विरामचिन्हांची नावे ओळखा:** १

| विरामचिन्ह | नाव |
|---|---|
| अ) ? | ____________ |
| ब) ! | ____________ |

**विभाग ४ – उपयोजित लेखन : १२**

**प्र. ४ अ) पत्रलेखन:** ४

'निसर्ग आपला मित्र'

त्वरा कार ! त्वरा करा ! त्वरा करा !

वनविभागातर्फे सर्व शाळांसाठी

**उपयुक्त उपक्रम**

फुले, फळे, औषधीवनस्पती, शोभेची झाडे

यांच्या रोपांचे निःशुल्क वाटप

कालावधीः

१५ ऑगस्ट ते २१ ऑगस्ट

रोपे मर्यादित

विद्यार्थी प्रतिनिधी या नात्याने

तुमच्या शाळेसाठी रोपांची मागणी करणारे पत्र वनविभाग अधिकाऱ्यांना लिहा.

किंवा

उत्तम उपक्रमाबद्दल वनविभागाच्या अधिकाऱ्यांचे अभिनंदन करणारे पत्र लिहा.

**आ) खालीलपैकी कोणतीही एक कृती सोडवा.** ४

**१) गदय आकलन :**

**पुढील उतारा वाचून प्रत्येकी एका वाक्यात उत्तर येईल असे चार प्रश्न तयार करा.**

शिक्षण क्षेत्रात चालवलेल्या कार्याचे महत्त्व इंग्रज सरकारलाही पटले. त्यांनी जोतीरावांचा गौरव करण्यासाठी पुण्यातील विश्रामबाग वाड्यात सार्वजनिक सभा बोलावली व भारी किमतीची शालजोडी जोतीरावांना अर्पण केली. जोतीरावांचे कार्य व्यापक होते. केवळ शाळा चालवणे एवढेच त्यांचे ध्येय नव्हते. त्यांना माणूस बदलायचा होता. मनुष्य मागील गोष्टींचे अंधानुकरण करून चालतो. काळ सारखा बदलत असतो. विचार करून माणसानेही बदलले पाहिजे, असे त्यांचे म्हणणे होते. 'सत्यपरता नाही धर्म। सत्य हेचि परब्रह्म।' हे संतांनी सांगितले. परंतु हे सत्य काय आहे हे शोधण्यासाठी माणसांनी प्रयत्न करायला नको काय? यासाठी 'सत्यशोधक समाजा' ची स्थापना जोतीबांनी केली. सत्यशोधक समाजाची जी तीन तत्त्वे सांगितली ती काही नवीन नव्हती. असे असतानाही त्या वेळच्या लोकांना जोतीबांचे सांगणे विचित्र वाटले.

**२) जाहिरातलेखन :**

**खालील विषयावर आकर्षक जाहिरात तयार करा.**

विद्यार्थी पुस्तक भंडार या विषयावर जाहिरात तयार करा.

**आ) कवितेच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.** ४

**१) आकृती पूर्ण करा.** १

कवितेतून तुम्हाला कळलेले निसर्गातले गुरू

↓ [ ] ↓ [ ]

**२) तक्ता पूर्ण करा.** १

| निसर्गातील घटक | त्यांच्याकडून माणसाने काय शिकावे ? |
|---|---|
| १) झाडे | |
| २) मुंग्या | |

बिन भिंतीची उघडी शाळा
लाखो इथले गुरू
झाडे, वेली, पशू, पाखरे
यांशी गोष्ट करू
बघू बंगला या मुंग्यांचा
सूर ऐकूया त्या भुंग्यांचा
फुलाफुलांचे रंग दाखवित
फिरते फुलपाखरू

हिंडू ओढे, धुंडू ओहळ
झाडावरचे काढू मोहळ
चिडत्या, डसत्या
मधमाश्यांशी
जरा सामना करू
भल्या सकाळी उन्हात न्हाऊ
ऐन दुपारी पऱ्हयात पोहू
सायंकाळी मोजू चांदण्या
गणती त्यांची करू

**२) दिलेल्या पंक्तीचा सरळ अर्थ लिहा.** २

भल्या सकाळी उन्हात न्हाऊ
ऐन दुपारी पऱ्हयात पोहू
सायंकाळी मोजू चांदण्या
गणती त्यांची करू

## विभाग ३ : भाषाभ्यास

**प्र. ३ अ) व्याकरण घटकांवर आधारित कृतीः** २

**१) पुढील वाक्यांचा काळ ओळखून लिहा.**

अ) मंडळी लेणा पाहायला आली. (काळ ओळखा)

ब) अंतिम सामना होणार. (भूतकाळ करा)

**२) खालील वाक्प्रचार व त्यांचे अर्थ यांच्या योग्य जोड्या जुळवा.** २

| वाक्यप्रचार | वाक्प्रचारांचे अर्थ |
|---|---|
| अ) चैन न पडणे | १) खूप मजा येणे. |
| ब) धमाल उडणे | २) अस्वस्थ होणे. |
| | ३) उत्साह वाढणे. |

**आ) शब्दसंपत्ती :**

**१) गटात न बसणारा शब्द ओळखा.** १

सकाळ, दुपार, सायंकाळ, प्रहर

३) **कथालेखनः**

**खालील मुद्दे विचारात घेऊन कथालेखन कराः**

सिंह __________ जंगलाचा राजा __________ त्रासदायक __________ प्राण्यांची सभा __________ सशाची युक्ती __________ तुमच्यापेक्षा बलवान सिंह __________ सिंहाला विहिरीजवळ आणतो __________ प्रतिबिंब __________ सिंहाची विहिरित उडी.


४) **बातमीलेखन :**

खालील विषयावर बातमी तयार करा.

जनता विदयालय, अहमदनगर येथे विविध उपक्रमांनी पर्यावरण दिन साजरा. मा. मुख्याध्यापक यांचे हस्ते वृक्षापोरण.


**इ) खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर निबंधलेखन करा.** ४

१) वर्णनात्मकः




२) **आत्मकथन**

**पुस्तकाची आत्मकथा लिहा.**




------------